# जागतिकरण व भारतीय पर्यावरण

**प्रा. तुळशीदास मोकल**
इतिहास विभाग प्रमुख
को.ए.सो. डॉ. सी.डी. देशमुख
वाणिज्य व सौ.के.जी ताम्हणे
कला महाविद्यालय, रोहा रायगड

**प्रस्तावना :**

'खाउजा' ही विसाव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडातील व एकविसाव्या शतकातील एक अतिशय महत्वाची संकल्पना 'खा' म्हणजे खाजगीकरण 'उ' म्हणजे उदारीकरण व 'जा' म्हणजे जागतिकीकरण तिन्ही घटकांना जगाच्या आर्थिक उत्क्रांतीचे परमावधी असे मानले जाते या तिन्ही घटकांचा भारतीय अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी वापर करण्यात आल्याने भारतातील सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण झाले. यामुळेच भारताच्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाची मालकी, त्याचे व्यवस्थापन व नियंत्रण खाजगी क्षेत्रातील उद्योगांना हस्तांतरित करण्यात आले व पुढे उदारीकरणाच्या धोरणाला अनुसरून अर्थव्यवस्थेवर लादण्यात आलेले निर्बंध व नियंत्रण काढून टाकण्यात आले पुढे जागतिकीकरण हे नवीन आर्थिक धोरणाचे एक महत्वाचे सूत्र आले व त्यांनी वस्तू, सेवा, तंत्रज्ञान व भांडवलावरील सर्व प्रकारचे निर्बंध दूर करून जागतिकीकरणाचा मार्ग सुखकर व गतिमान केला. याच जागतिकीकरणाला दुसऱ्या शब्दात 'वैश्विकरण' असेही म्हटले जाते. या जागतिकीकरणामुळे भारताची स्थानिक अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली व भारत जागतिकीकरणाच्या प्रवाहात समाविष्ट झाला.

प्रस्तुत शोध निबंधात जागतिकीकरणाचे भारतातील पर्यावरणातील कोणत्या घटकांवर परिणाम झाले आहेत तसेच या परिणामाला सामोरे जाण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजनांची अंमलबजावणी काय करायला पाहिजे याची माहिती चिकित्सक पद्धतीने मांडण्यात आलेली आहे.

1) **भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन :-** जागतिकीकरण प्रक्रियेमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात प्रवेश करण्याची संधी मिळाली. परिणामी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात मोठ्या प्रमाणात शिरकाव केला. सन २००३ मध्ये भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या १९४७ झाली. हीच संख्या २००४ पर्यंत १६५४ वर पोहचली. आता टप्प्याटप्प्याने या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या संख्येत वाढ होत आहे. या कंपन्या आंतरराष्ट्रीय कंपन्या, जागतिक कंपन्या, सीमापार कंपन्या या नावाने वावरत आहेत. जगात या प्रकारच्या तीनशे कंपन्या आहेत. व जगातील 25% संपती या कंपन्यांच्या मालकीचे आहे. जागतिकीकरणामुळे भारताने बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या अर्थव्यवस्थेतील महत्वाच्या क्षेत्रांचा ताबा दिला आहे. नैसर्गिक संपत्तीच्या त्रुटीचा तसेच पर्यावरण प्रदूषित करण्याचा हक्कही दिला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अलीकडेच भारत सरकारने, 'गॅस अँथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड' किंवा 'गेल' च्या 18% समभागाची विक्री केली आहे. यातील ५ समभाग एन्रॉन कार्पोरेशन व १.३% समभाग ब्रिटीश कंपणीने विकत घेतले. भारतातील 95% हिस्स्यावर या कंपनीचे वर्चस्व आहे. याशिवाय 'तेल' व 'नैसर्गिक वायू' महामंडळाने शोधून विकसित केलेले तेलक्षेत्र देखील खाजगी उद्योग समूहाच्या ताब्यात दिले जात आहे. या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतातील पर्यावरणातील कोणत्या घटकांवर परिणाम होतो हे जाणून घेणे आवश्यक आहे.

२) **जागतिकीकरणाचा भारतीय पर्यावरणावरील परिणाम:-** जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतात आल्याने पर्यावरण प्रदूषणाचे स्वरूप गंभीर झाले. व हे प्रदूषणाचे गंभीर स्वरूप संकट रूपाने आज समस्त भारतीयांना पुढे उभे आहे. त्यामुळे 'आम्लपर्जन्य, कार्बन डाय-ऑक्साइड, वायूमध्ये वाढ, हरितगृह परिणाम, तापमान वाढ' यासारख्या पर्यावरणीय आपत्तींना आज आपल्याला तोंड द्यावे लागत

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - V / VI

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.505
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - VI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराजांची लष्कर व्यवस्था<br>प्रा. सीमा जा. भोसले | १-६ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DE...
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5...

# १. छत्रपती शिवाजी महाराजांची लष्कर व्यवस्था

प्रा. सीमा जा. भोसले
डॉ. सी.डी. देशमुख वाणिज्य व सौ. के.जी. ताम्हाणे कला महाविद्यालय, रोहा. ता. रोहा, जि. रायगड.

**प्रस्तावना**

छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन काळात आदर्श राज्य निर्माण केले होते. मध्ययुगीन काळातील सुलतान आणि मोगल राजे यांच्या अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य अधिकच उठावदार आहे. काही इतिहासकार छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना नेपोलियनशी करतात. छत्रपती शिवाजी महाराज जेवढे प्रशासनाला महत्व देत तेवढेच स्वराज्यालाही देत असत. छत्रपती शिवाजी महाराज हे लोककल्याणकारी राजे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी तयार केलेली सैन्य रचना आणि व्यवस्थापन. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिस्तबद्ध सैन्य रचनेमुळे मराठयांना बऱ्याच मोहिमांमध्ये हमखास यश मिळायचे. शत्रूसैन्याची फळी फोडत असताना मराठी फौज विस्कळीत होणार नाही याची छत्रपती शिवाजी महाराजांनी नेहमी दक्षता घेतलेली असायची. त्यामुळे सैन्याला लढाईवर जातानाच एक वेगळाच असा आत्मविश्वास निर्माण व्हायचा.

प्रत्येकाला जेवढे काम दिलेले असायचे तेवढेच त्याने चोखपणे बजावले की यश हमखास मिळायचे. महाराज जेवढया कुशलतेने युद्ध मोहिमांचे नियोजन करायचे तेवढयाच कठोरतेने त्यांचे शिलेदार आणि मावळे त्यांची अंमलबजावणी सुद्धा करायचे.

**शोध निबंधाची उदिष्टे**

१. छत्रपती शिवाजी महाराजांची लष्कर व्यवस्था समजून घेणे.
२. शिवकालीन लष्कर व्यवस्थेच्या धोरणांचा अभ्यास करणे.

**शोध निबंधाची गृहितके**

१. शिवाजी महाराजांनी भविष्यकालीन लष्कर व्यवस्था ओळखली होती.
२. शिवाजी महाराजांनी युद्ध मोहिमेच्या वेळी लष्कर व्यवस्थेचा उपयोग केला होता.
३. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या व्यवस्थेचा धोका ओळखून त्यावर लष्कर व्यवस्थांचे नियोजन केले होते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तूत शोध निबंधासाठी दुय्यम साधनांचा (स्त्रोतांचा) वापर करण्यात आला आहे. त्यात विविध मासिके, संदर्भपुस्तके, इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.